दाखल दिनांक : ३०.०६.२००८

नोंदणी दिनांक : ३०.०६.२००८

न्यायनिर्णय दिनांक : ०९.१०.२०१५

कालावधी : वर्ष महिने दिवस
०७ ०३ ०९

**न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, न्यायालय क्रमांक २, भूम यांच्या न्यायालयात**
( पीठासीन अधिकारी ए. एन. माने )

**नियमित फौजदारी खटला क्र.९८/२००८** **निशाणी नं.८६**

महाराष्ट्र शासन तर्फे,
शिवाजी सोपान काळे,
वय— ४६ वर्षे, धंदा — मजूरी
रा. पारधीपिढी, भुम, ता. भुम,
जिल्हा उस्मानाबाद. ..फिर्यादी

**—विरूध्द—**

१. दत्ता सोपान काळे
वय ४५ वर्षे, धंदा— मजूरी,
रा. पारधी पिढी भुम, ता. भुम, जि. उस्मानाबाद.

२. कविता दत्ता काळे
वय ३० वर्षे, धंदा घरकाम,रा. सदर.**(फरार)**

३. मिराबाई लाला काळे
वय ३८ वर्षे, धंदा मजूरी, रा. सदर.

४. मालनबाई लाला काळे
वय ३० वर्षे, धंदा मजूरी,रा. सदर.**(फरार)**

५. लाला सोपान काळे
वय ४० वर्षे, धंदा व रा. सदर. ..आरोपी

**(आरोपी क. 1,3 व 5 चा खटला आरोपी क.2 व 4 यांचेपासून वेगळा करून चालवण्यात आला.)**

**आरोप**:— भारतीय दंड विधान कलम १४३, १४७, ३२४, ३२३, ५०४ सह १४९ अन्वये.

श्री. एस. बी. सय्यद, सहाय्यक सरकारी विधिज्ञ फिर्यादीकरीता.

श्री. आर. बी. पाटील, विधिज्ञ आरोपी करीता.

## न्या य नि र्ण य

( दिनांक: ०९ ऑक्टोबर, २०१५ रोजी घोषीत )

१ प्रस्तुतचा खटला आरोपी यांचे विरूध्द भा.द.वि.कलम १४३,१४७,३२४,३२३,५०४ सह १४९ अन्वये दाखल करण्यात आला आहे.

२ अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालील प्रमाणे :—

दिनांक ०२/०४/२००८ रोजी भवानी आई येथे लाल्या सोपान काळे यांचेकडे पारधी येणार असल्याने फिर्यादी हा संध्याकाळी सात वाजण्याचे सुमारास त्याची मोटार सायकल क्र. एम.एच. २५—४७९० यावर तो व त्याची पत्नी बायडाबाई असे गेले, त्यावेळी भवानी आई मंदीराजवळ त्यांचा मेव्हणा लहु सोपान काळे रा.साबळेवाडी हा तेथे भेटला व त्याला म्हणाला की, तुम्ही इकडे कसं काय आलात असे विचारले असता, तो त्यास म्हणाला की, लाल्या यांचे मुलीचा साखरपुडा आहे असे म्हणाले असता, तो त्यांना म्हणाला की, मी पण येवू का असे विचारले असता, तो त्यास म्हणाला की, तुला यायचे असेल तर चल व त्यांचे सोबत तो लाल्या सोपान काळे यांचे घरी गेला. लाल्या सोपान काळे यांचे घरी ते तिघे गेले असता, लाल्या काळे लहु यास म्हणाला की, तु त्यांचे सोबत कसा काय आला असे म्हणून त्यास शिवीगाळ करून लाथा बुक्याने मारहाण करू लागले व तु का आला म्हणून त्यास मारहाण करू लागलेने तसेच त्याला दत्ता सोपान काळे व मिराबाई लाल्या काळे, कविता दत्ता काळे सर्व रा. भवानी आई मंदीर यांनी पण फिर्यादीला शिवीगाळ करू लागले.

३ लाल्या सोपान काळे याने त्याचे डावे हाताचे कोप—याजवळ व उजव्या हाताचे अंगठयावर चावा घेतला व दत्ता सोपान काळे यांनी हातात काठी

घेवून त्याचे पाठीत मारहाण केली व मिराबाई लाल्या काळे यांनी हातात दगड घेवून फिर्यादीचे डोक्यात मारून जखमी केले. सदर भांडणांत त्याची १० ग्रॅम सोन्याची अंगठी व हातातील घडी पडून गहाळ झाली, ती वेळ संध्याकाळी आठ वाजण्याची होती. कविताबाईने शिवीगाळ केली आहे. म्हणून सदरची फिर्याद दाखल केली. सदर फिर्यादीवरून गुन्हा रजिस्टर क्र. २३/२००८, भारतीय दंड विधान कलम ३२४, ३२३, ५०४ सह ३४ अन्वये गुन्हा नोंद होवून पुढील तपास तपासिक अंमलदार यांचेकडे वर्ग करण्यात आला. तपासिक अंमलदार यांनी तपास पुर्ण करून आरोपी यांचे विरूध्द भा.द.वि.कलम १४३, १४७, ३२४, ३२३, ५०४, सह १४९ अन्वये दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

४ आरोपी क्र.२ कविता दत्ता काळे व आरोपी क्र.४ मालनबाई लाला काळे सतत गैरहजर असल्यामुळे व आरोपी क्र.१ दत्ता सोपान काळे आरोपी क्र. ३ मीराबाई लाला काळे, आरोपी क्र.५ लाला सोपान काळे हे न्यायालयात हजर असल्यामुळे व सदरचे प्रकरण जुने असल्यामुळे निशाणी १ वरती आदेश पारित करुन आरोपी क्र.१, ३ व ५ यांचा खटला आरोपी क्र.२ व ४ यांच्या खटल्यापासुन वेगळा करुन आरोपी क्र.१, ३ व ५ यांचा भारतीय दंड विधान कलम १४३, १४७, ३२४, ३२३, ५०४, सह १४९ अन्वये निशाणी ६९ वर दोषारोप निश्चित करून ते त्यांना मराठी भाषेत वाचून व समजावून सांगितले असता, त्यांनी गुन्हा नाकबुल करून खटला पुढे चालविण्याची मागणी केली. फौजदारी प्रक्रीया संहिता कलम ३१३ अन्वये आरोपी यांचा जबाब निशाणी ८३ ते ८५ वर नोंदविण्यात आला. सदरचा खटला खोटा आहे असे म्हणून आरोपी यांनी बचाव घेतला.

५ वरील परिस्थितीवरून खालील मुद्दे माझे विवेचनाकरीता निघत असून त्याचे निष्कर्ष, मी खालील कारणांकरीता नोंदवित आहे.

| अ.क्र. | **मुद्दे.** | **निष्कर्ष.** |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १ | दिनांक ०२/०४/२००८ रोजी सायंकाळी ०७.०० वाजणेचे सुमारास भवानी मंदीर, भूम जवळ आरोपी दत्ता, मिराबाई व लाला हे फरार आरोपी कविता व मालनबाई यांचे समवेत त्यांचे सामाईक उद्दिष्ट साधणेकरीता ते बेकायदेशीर जमावाचे सदस्य होवून दंगल करून भारतीय दंड विधान कलम १४३ सह १४९ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष शाबीत करते काय ? | नकारार्थी. |
| २ | वरील दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी दत्ता, मिराबाई व लाला हे फरार आरोपी कविता व मालनबाई यांचे समवेत त्यांचे सामाईक उद्दिष्ट साधणेकरीता ते बेकायदेशीर जमावाचे सदस्य होवून दंगल करून भारतीय दंड विधान कलम १४७ सह १४९ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष शाबीत करते काय ? | नकारार्थी. |
| ३ | वरील दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी दत्ता, मिराबाई व लाला हे फरार आरोपी कविता व मालनबाई यांचे समवेत त्यांचे सामाईक उद्दिष्ट साधणेकरीता बेकायदेशीर जमावाचे सदस्य होवून फिर्यादी यांस काठीने मारहाण करून जखमी करून भारतीय दंड विधान कलम ३२४ सह १४९ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष शाबीत करते काय? | नकारार्थी. |
| ४ | वरील दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी दत्ता, मिराबाई व लाला हे फरार आरोपी कविता व मालनबाई यांचे समवेत त्यांचे सामाईक उद्दिष्ट साधणेकरीता बेकायदेशीर जमावाचे सदस्य होवून फिर्यादी यांस काठीने मारहाण करून जखमी करून भारतीय दंड विधान कलम ३२३ सह १४९ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष शाबीत करते काय? | नकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| ५ | वरील दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी दत्ता, मिराबाई व लाला हे फरार आरोपी कविता व मालनबाई यांचे समवेत त्यांचे सामाईक उद्दिष्ट साधणेकरीता बेकायदेशीर जमावाचे सदस्य होवून फिर्यादी यांना शिवीगाळ करून अपमानित करून सार्वजनिक शांततेचा भंग करतील असे प्रक्षोभन देवून भारतीय दंड विधान कलम ५०४ सह १४९ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष शाबीत करते काय? | नकारार्थी |
| ६ | अंतिम आदेश ? | आरोपी यांना दोषमुक्त केले. |

## <u>कारण—मिमांसा</u>

**<u>मुददे क. १ ते ६ करीता :—</u>**

६ पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी मी मुद्दे क्र. १ ते ६ चे विवेचन एकत्रितरित्या करीत आहे.

७ आरोपी यांचा भारतीय दंड विधान कलम १४३, १४७, ३२४, ३२३, ५०४, सह १४९ अन्वये गुन्हा संशयापलिकडे शाबीत करणेकरीता अभियोग पक्ष यांनी एकुण पाच साक्षीदार तपासले आहेत. साक्षीदार क्र. १ पंच दशरथ जयसिंग चंदनशिवे यांना निशाणी ७३ वर तपासण्यात आले आहे, साक्षीदार क्र. २ कैलास लक्ष्मण जगदाळे यांना निशाणी ७५ वर तपासण्यात आले आहे. साक्षीदार क्र. ३ फिर्यादी शिवाजी सोपान काळे यांना निशाणी ७७ वर तपासले आहे. साक्षीदार क्र. ४ बायडाबाई शिवाजी काळे यांना निशाणी ७९ वर तपासले आहे आणि साक्षीदार क्र. ५ तपासिक अंमलदार शिवाजी रानबा सर्जे यांना निशाणी ८० वर तपासण्यात आले आहे.

८ पंच साक्षीदार क्र. १ दशरथ चंदनशिवे यांनी शपथेवर असे कथन

केले आहे की, दिनांक ०३/०४/२००८ रोजी त्याला आणि राजेंद्र याला पोलिसांनी पंचनाम्यासाठी बोलाविले नव्हते. पोलीसांनी त्यांचे समक्ष काही जप्त केले नाही व काही लिहिले नाही. पंचनाम्यावर केवळ त्याची सही आहे. त्यातील मजकूर त्याला माहित नाही. सदर साक्षीदार यांनी अभियोग पक्ष यांना सहाय्य केले नाही म्हणून त्यास फितुर घोषित करून अभियोग पक्ष यांनी त्यांचा उलट तपास घेतला परंतु उलट तपासामध्ये अभियोग पक्षास सदर पंचनामा शाबीत करण्यास अपयश आलेले आहे, तसेच गुन्हयात वापरलेली वाकडीतिकडी काठी जप्त केलेबाबतचा पंचनामा हा संशयापलीकडे शाबीत करण्यास अपयश आले आहे. पुढे सदर साक्षीदार यांचा आरोपी यांनी उलटतपास घेतला असता असे कबुल केले आहे की पोलीसांनी सही करा असे म्हटल्यामुळे त्यांनी सही केली, बाकीचे त्यांना काही माहिती नाही.

९ साक्षीदार क्र. २ कैलास जगदाळे यांनी शपथेवर असे कथन केले आहे की, घटनेबाबत त्याला काही माहित नाही. पोलीस त्याचेकडे चौकशीसाठी आले नव्हते व पोलीसांनी त्यांचा जबाब घेतला नव्हता. पुढे असे कथन करतो की, असे काही घडले नाही की, दिनांक ०२/०४/२००८ रोजी संध्याकाळी ८.०० वाजता पारधी वस्तीवर पाहिले की, सर्व आरोपी हे शिवाजी काळे यास काठीने व दगडाने मारहाण करत होते. सदर साक्षीदार यांनी देखील अभियोग पक्ष यांना सहाय्य केले नाही म्हणून त्यास फितुर घोषित करून अभियोग पक्ष यांनी त्यांचा उलट तपास घेतला परंतु उलट तपासामध्ये अभियोग पक्षास आरोपीविरूध्द सबळ पुरावा नोंदविण्यास अपयश आलेले आहे.

१० साक्षीदार क्र. ३ फिर्यादी शिवाजी काळे यांनी शपथेवर असे कथन केले आहे की, ते सर्व आरोपींना ओळखतात. सदरची घटना ही सहा वर्षापुर्वी रात्री ८.३० ते ९.०० वाजण्याच्या दरम्यान भवानी आई मंदीराजवळ भूम— हाडोंग्री शिवारात घडली. दत्ता, मिराबाई व लाला हे भूम व हाडोंग्री शिवारात

राहण्यास आहेत. ते त्या दिवशी भूम येथे होते. त्यावेळी लालाच्या मुलीचा साखरपुडा असल्याबाबत साखरपुडयाच्या कार्यक्रमाला यायचे असेल तर या असा त्यांना फोन आला. त्यानंतर ते व त्यांची पत्नी बायडाबाई मोटारसायकलवर जाण्यासाठी निघाले. त्यावेळी त्यांचा मेव्हणा लहु सोपान काळे त्यांना स्टॅंडवर भेटला. त्यावेळी लहु याने त्यांना विचारले की, तुम्ही कुठे चालला, त्यावेळी त्याने त्याला साखरपुडयाला चाललो आहे असे सांगितले. त्यावेळी त्याने मी पण येवू का असे त्यास विचारले. त्यावेळी त्याने त्याला यायचे असेल तर चल असे म्हणाला व ते तिघे जण तेथे गेले. तेथे गेल्यानंतर दत्ता व लाला म्हणाले की, एवढया रात्री कशाला आलात, त्यावर ते त्यांना म्हणाले की, तुम्ही बोलावल्यामुळे आम्ही आलो. त्यानंतर मागील कुरापत काढून वाद चालू केला व त्यांना धरायला व हाणायला चालू केले. त्यांचा मेव्हणा लहु जो त्यांचेसोबत आला होता त्यालाही मारायला व हाणायला चालू केलेनंतर तो देखील ओरडायला लागला. त्याने आरडा ओरडा केल्यानंतर दत्ता व त्यांची बायको यांनी त्याचा पाठलाग करून २०० ते ३०० फुटावर जावून त्यास पकडले व त्यास तिकडेच ठेवले. त्यांची नजरभेट होवू दिली नाही. त्यानंतर त्यांनी तेथून पळ काढला व पोलीस स्टेशन येथे अर्ज दिला. त्यांना फिर्याद दाखवली असता त्यावर त्याचा अंगठा असून त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे असे कथन केले आहे. सदर फिर्यादी यांचा आरोपी यांनी उलट तपास घेतला असता उलट तपासामध्ये सदर साक्षीदार यांनी असे कबुल केले आहे की, त्यांचा जमीनीबाबतचा वाद चालु आहे. तसेच आरोपी यांनी उलटतपासामध्ये त्यांचा सरतपासामध्ये आलेला पुरावा नाकारलेला आहे.

११ साक्षीदार क्र. ४ बायडाबाई काळे यांनी शपथेवर असे कथन केले आहे की, ती सर्व आरोपींना ओळखते. शिवाजी काळे हे तिचे पती आहेत. सदरची घटना पाच ते सहा वर्षापूर्वी त्यांचे शेतामध्ये रात्री ८.०० ते ९.०० वाजता घडली होती. त्यावेळी त्यांची भावा—भावाची भांडणे लागली होती.

त्यावेळी ती तेथून लगेच पळून गेली व पुढे काय झाले हे तिला माहित नाही. सदर साक्षीदार यांनी देखील अभियोग पक्ष यांना सहाय्य केले नाही म्हणून त्यास फितुर घोषित करून अभियोग पक्ष यांनी त्यांचा उलट तपास घेतला परंतु उलट तपासामध्ये अभियोग पक्षास आरोपीविरूध्द सबळ पुरावा नोंदविण्यास अपयश आलेले आहे.

१२ साक्षीदार क्र. ५ शिवाजी सर्जे यांनी शपथेवर असे कथन केले आहे की, दिनांक ०३/०४/२००८ रोजी ते भूम पोलीस स्टेशन येथे पो.हे.कॉ. म्हणून नेमणुकीस होते. त्यादिवशी पो.हे.कॉ. शेख यांनी घटनेची फिर्याद दिली व पुढील तपास त्यांच्याकडे दिला. त्यानंतर ते घटनास्थळी गेले व दोन पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा केला. घटनास्थळ हे देवीच्या मंदीराजवळ होते. तेथे असे निष्पन्न झाले की, आरोपी हे लहू सोपान काळे यास का घेवून आला असे म्हणून लाला सोपान काळे याने डाव्या हाताचे कोपरास व उजव्या हाताच्या अंगठयास चावा घेतला व हातात दगड घेवून डोक्यात मारून जखमी केले. दत्ता सोपान काळे याने काठीने डोक्यात मारून जखमी केले व इतर आरोपींनी त्यास लाथा—बुक्याने मारहाण करून शिवीगाळ केली. तसेच फिर्यादी यांच्या मोटारसायकलवर दगड मारून नुकसान केले. घटनास्थळावरून चार फुट लांबीची सुबाभळीची एक काठी जप्त केली व पंचनामा तयार केला.

१३ पुढे कथन केले आहे की, त्यानंतर त्यांनी साक्षीदार बायडाबाई शिवाजी काळे हिचा जबाब नोंदविला होता. बायडाबाई यांचे जबाबातील अधोरेखांकित भाग ''अ'' असून तो अधोरेखांकित भाग ''अ'' तिचे सांगणे प्रमाणे लिहीला आहे, तो बरोबर आहे, तो निशाणी ८१ वर आहे. त्यानंतर त्यांनी साक्षीदार कैलास लक्ष्मण जगदाळे यांचा देखील जबाब नोंदविला. साक्षीदार कैलास यांचे जबाबातील अधोरेखांकित भाग ''अ'' त्याचे सांगण्याप्रमाणे लिहीला असून तो बरोबर असुन तो अधोरेखांकित भाग ''अ'' हा निशाणी ८२

वर दिला आहे. त्यानंतर आरोपी यांचेविरुध्द पुरावा मिळुन आल्याने त्यांचेविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. आरोपींना तो ओळखु शकतो, त्यापैकी तीन आरोपी न्यायालयात हजर आहेत. सदर साक्षीदार यांचा आरोपी यांनी उलट तपास घेतला असता उलट तपासामध्ये सदर साक्षीदार यांनी असे कबुल केले आहे की, मोटारसायकलचा नंबर एम.एच.२५/४७३० हा होता, तसेच मोटारसायकलचे तोंड कुठल्या बाजूस होते हे त्यांना सांगता येत नाही. तसेच कबुल करतात की, मारहाण केलेली व चावा घेतलेले त्यांनी प्रत्यक्ष पाहिलेले नाही.

१४ एकंदरित अभियोग पक्ष यांनी आणलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसते की, अभियोग पक्ष यांना घटनास्थळ पंचनामा तसेच गुन्हयात वापरलेल्या सुबाभळीची काठीचा जप्ती पंचनामा हा संशयापलीकडे सिध्द करण्यास अपयश आलेले आहे. तसेच घटनेच्या ठिकाणी हजर असणारे स्वत: फिर्यादीची बायको, सा.क्र.४ बायडाबाई काळे तसेच सा.क्र.२ कैलास जगदाळे यांनी देखील अभियोग पक्षास कुठल्याही प्रकारे सहाय्य केले नाही. सा.क्र.३ फिर्यादी यांच्या तोंडी पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसते की, फिर्यादी यांनी त्यांच्या फिर्यादीतील जबाबाशी विसंगत असा तोंडी पुरावा नोंदविला आहे. फिर्यादी यांनी त्यांचे तोंडी पुराव्यामध्ये लाल्या काळे याने त्याच्या डावे हाताच्या कोप—यास व उजव्या हाताच्या अंगठयाचा चावा घेतला, दत्ता सोपान काळे याने हातात काठी घेवुन त्याच्या पाठीत मारहाण केली, तसेच मीराबाई हिने हातात दगड घेवुन त्याच्या डोक्यात मारुन जखमी केले व कविताबाई हिने शिवीगाळ केली व १० ग्रॅम सोन्याची अंगठी व हातातील घ ाडयाळ गहाळ झाले व ती वेळ संध्याकाळी ८.०० वाजताची होती हे सांगितलेले नाही. त्यामुळे सदर बाबीपुरती फिर्यादीची फिर्याद ही संशयापलीकडे शाबीत झालेली नाही.

१५　　　तसेच सा.क्र.५ तपासिक अंमलदार यांचादेखील तोंडी पुरावा पाहता असे दिसते की, त्याने फिर्यादी यांचे पुराव्याशी विसंगत असा तोंडी पुरावा नोंदविला आहे. सदर तपासिक अंमलदार यांनी उलटतपासामध्ये असे कबुल केले आहे की, फिर्यादी याचे मोटारसायकलचा नंबर एम.एच.२५/४७३० हा होता, परंतु फिर्याद पाहता असे दिसते की, फिर्यादीमध्ये मोटारसायकलचा क्र. एम.एच. २५/४७९० हा दिलेला आहे. तसेच मोटारसायकलचे तोंड कोणत्या बाजुला होते हे देखील तपासीक अंमलदार यांना सांगता आलेले नाही. यावरुन असे दिसते की, त्यांनी केलेला घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा हा संशयापलीकडे सिध्द झालेले नाही व त्यांचे तथ्यतेबाबत संशय निर्माण होतो. तसेच त्यांचा तोंडी पुरावा की, त्याचे तपासात असे निष्पन्न झाले की, आरोपी हे लहु सोपान काळे यास का घेवुन आला असे म्हणुन लाला सोपान काळे याने डावे हाताच्या कोपरास व उजव्या हाताच्या अंगठयास चावा घेतला व दत्ता सोपान काळे याने काठीने डोक्यात मारुन जखमी केले व इतर आरोपींनी त्याला लाथा—बुक्क्याने मारहाण करुन शिवीगाळ केली ही बाब विश्‍वासाहर्य वाटत नाही कारण अभियोग पक्ष यांनी तपासलेला एकही साक्षीदार त्यांच्या तोंडी पुराव्याशी सुसंगत असा तोंडी पुरावा नोंदवित नाही. तसेच तपासिक अंमलदार यांनी केलेले कथन की, लाला सोपान काळे याने हातात दगड घेवुन मारहाण केली व दत्ता सोपान काळे याने काठीने डोक्यात मारुन जखमी केले या बाबी देखील फिर्यादी यांचे फिर्यादीशी विसंगत अशा दिसुन येतात.

१६　　　तसेच अभियोग पक्ष यांना पुरेशी संधी देवुनही त्यांनी इतर स्वतंत्र साक्षीदार तपासले नाहीत. वैदयकिय अधिकारी यांना देखील तपासलेले नाही. तसेच गुन्हयात वापरलेला दगड व काठी हे देखील न्यायालयासमोर सिध्द केले नाही. तसेच साक्षीदार क्र.१ ते ५ यांनी कुठेच आरोपी यांनी बेकायदेशीर जमाव जमवुन सामाईक उद्‌दिष्टपुर्तीकरीता हातात दगड व काठी घेवुन दंगल करुन अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करुन अपमाणित केले या बाबी सांगीतलेल्या नाहीत.

१७ एकंदरित, वरील विवेचनावरुन असे दिसते की, आरोपी यांनी बेकायदेशिर जमाव जमवुन सामाईक उद्दिष्टपुर्तीकरीता हातात काठी व दगड घेवुन दंगल करुन फिर्यादी यांना मारहाण करुन जखमी करुन अर्वाच्च्य भाषेत शिवीगाळ करुन अपमाणित करुन त्यांची गाडी फोडुन नुकसान केले ही बाब दिसून येत नाही. त्यामुळे या ठिकाणी असे दिसते की, आरोपी यांचेवरती ठेवण्यात आलेले भा.द.वि.कलम १४३,१४७,३२४,३२३,५०४ सह १४९ अन्वये दोषारोप हे अभियोग पक्ष यांना संशयापलीकडे शाबीत करण्यास अपयश आलेले आहे. त्यामुळे मी मुद्दे क्र. १ ते ५ चे उत्तर नकारार्थी नोंदवून मुद्दे क्र. ६ चे उत्तराकरीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१ आरोपी क्र. १) दत्ता सोपान काळे, ३) मिराबाई लाला काळे, ५) लाला सोपान काळे सर्व रा. भुम, ता. भुम, जि. उस्मानाबाद यांना भारतीय दंड विधान कलम १४३, १४७, ३२४, ३२३, ५०४ सह १४९ या गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८ (१) अन्वये सबळ पुराव्या अभावी दोषमुक्त करण्यात येत आहे.

२ आरोपी क्र. १, ३ व ५ यांचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३ जप्त मुद्देमाल एक सुबाभळीच्या लाकडाची वाकडी तिकडी खनपट असलेली काठी राहिलेल्या आरोपी क्र. २ कविता दत्ता काळे, आरोपी क्र.४ मालनबाई लाला काळे यांचे खटल्याकरीता राखुन ठेवण्यात येत आहे.

४ आरोपी यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७ (अ) अन्वये प्रत्येकी रु.५,०००/— चा जामीन दयावा.

५ आरोपी क्र.२ कविता दत्ता काळे व क्र.४ मालनबाई लाला काळे दोघे रा. पारधी पिढी, भूम ता.भूम जि.उस्मानाबाद यांचेविरूध्द सदरचा खटला चालू ठेवण्यात येत आहे.

(खुल्या न्यायालयात जाहीर.)

सही/—
दिनांक : ०९—१०—२०१५. ( ए. एन. माने ),
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग
न्यायालय क्र.२, भुम.